अर्ज केल्याची तारीख 23/9/1
नक्कल ... ची तारीख
अर्जाप्रमाणे नक्कल दिल्याची तारीख 28/9/
ची स्वीकारल्याची तारीख

चौ. अर्ज क्र. 995
निशाणी नं.

अधीक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
पुणे विभाग, पुणे

ध. उ. आ.
पुणे

परिशिष्ठ 'क'

# कै. राजाराम तुकाराम भोईटे स्मृती आरोग्य प्रतिष्ठान, बारामती. जि. पुणे.

## या संस्थेचे नियम व नियमावली

1 नियमावलीतील संदर्भीय शब्दांची व्याख्या

खालील संज्ञांची व्याख्या साधारणपणे पुढील प्रमाणे राहतील.

| | | | |
|---|---|---|---|
| अ) | ट्रस्ट | : | म्हणजे विश्वस्त संस्था. |
| ब) | कार्यकारी मंडळ | : | म्हणजे या संस्थेच्या व्यवस्थापनासाठी नेमलेले किंवा निवडले गेलेले सदस्यांचे मंडळ. |
| क) | ट्रस्टी किंवा विश्वस्त | : | म्हणजे त्या व्यक्तिकडे केवळ त्याकडेच किंवा इतर व्यक्तिच्या समवेत विश्वस्त मालमत्ता विहित असेल ती व्यक्ती. |
| ड) | कार्यक्षेत्र | : | म्हणजे संस्था ज्या क्षेत्राच्या मर्यादेत कार्य करणार आहे ते क्षेत्र. |
| इ) | सभासद | : | म्हणजे मूळ विश्वस्त (संस्थापक सदस्य),वेळोवेळी नियुक्त केलेले सन्माननीय सभासद व आजीव सभासद. |
| ई) | ट्रस्ट किंवा फंड मिळकत | : | म्हणजे संस्थेच्या मालकी व संस्थेच्या ताब्यात दिलेली सर्व गुंतवणूक, रक्कम, स्थावर व जंगम मिळकत यामध्ये विशिष्ट हेतूसाठी संस्थेच्या देणगी रुपाने स्वीकारण्याच्या रक्कमेच्या मालमत्तेचा समावेश राहील. |
| ग) | आर्थिक वर्ष | : | म्हणजे 1 एप्रिल पासून सुरू होऊन 31 मार्च रोजी संपणाऱ्या 12 महिन्यांचा कालावधी असेल. |

2 कार्यक्षेत्र : महाराष्ट्र राज्य

3 हिशोबाचे वर्ष : 1 एप्रिल ते 31 मार्च अखेरचे राहील.

4 सभासदत्व व त्यांची निवड / नियुक्ती :

संस्थेचे सभासदांची निवड ही संस्थेच्या संस्थापक सदस्य (विश्वस्त) यांचे मार्फत केली जाईल. संस्थापक सदस्य (विश्वस्त) यांच्या मान्यतेनुसार व्यक्ति व संस्थेचे सभासदत्व दिले जाईल.

5 सभासदांचे प्रकार :

1) संस्थापक सभासद : संस्था स्थापन करतेवेळी असणारे विश्वस्त.

2) रूपये 1,00,000 = 00 (रू. एक लाख फक्त) अगर त्यापेक्षा जास्त देणाऱ्या व्यक्तिस विश्वस्तांच्या संमतीने आजीव सभासद होता होईल.

3) सन्माननीय सभासद : समाजातील प्रतिष्ठीत व्यक्ति, वैद्यकीय क्षेत्रातील नामवंत व तज्ञ व्यक्ति, समाजकार्यामध्ये नावाजलेली तसेच संस्थेच्या उद्देश्यपूर्तीसाठी संस्थेस सहकार्य करण्यास तयार असणाऱ्या व्यक्तिस संस्थेच्या मूळ संस्थापक सदस्य (विश्वस्त) यांच्या संमतीने सन्माननीय सभासदांच्या सभासद म्हणून नियुक्त केले जाईल. अशा सन्माननीय सभासदांच्या सभासदत्वाचा

कालावधी विश्वस्तांद्वारे निश्चित केला जाईल.

6

अ) सभासद फौजदारी गुन्ह्याखाली शिक्षेस पात्र झाल्यास.

ब) त्यांचेकडून अनैतिक अधःपतन झाल्यास.

क) एखाद्या सदस्याने संस्थेच्या हिताविरूद्ध वर्तन केल्यास व अशा गोष्टी संस्थापक सदस्य (विश्वस्त) यांच्या नजरेसमोर आल्यानंतर संस्थापक सदस्य (विश्वस्त) यांच्या बहुमताच्या निर्णयाने सभासदाचे सदस्यत्व रद्द केले जाईल.

7 सर्वसाधारण सभा व तिचे अधिकार :

अ) सर्वसाधारण सभा ही संस्थेची सर्वश्रेष्ठ व निर्णयी सभा म्हणून समजली जाईल.

ब) या सभेत सर्व प्रकारचे सभासद भाग घेऊ शकतील.

क) उपस्थित सभासदांकडे संस्थची कोणतीही रक्कम बाकी नसावी. बाकी असल्यास त्या सदस्याला मतदानात भाग घेता येणार नाही.

ख) कार्यकारी मंडळाने चालविलेल्या कामावर नियंत्रण ठेवणे.

ग) वार्षिक हिशोब मंजूर करणे.

घ) वेळेवर अध्यक्षांचे परवानगीने येणारे ठराव सभेसमोर मांडून मंजूर अगर नामंजूर करणे.

च) सर्वसाधारण सभेची सूचना व गणसंख्या.

सर्वसाधारण सभेसाठी सात पूर्ण दिवसांची नोटीस सदस्यांना देण्यात येईल. त्यामध्ये अशी सभा ज्या तारखेस, ज्यावेळेस व जेथे घेण्यात येईल ती तारीख, वेळ व जागा तसेच सदर सभेत करण्यात येणारे कामकाज निर्दिष्ट करण्यात येईल व सदरची नोटीस संस्थेच्या कार्यालयात लावली जाईल. सर्वसाधारण सभेची गणसंख्या पूर्ण करण्यासाठी सर्व प्रकारच्या सभासदांची एक तृतीयांश उपस्थिती असणे आवश्यक आहे. सभेच्या वेळी आवश्यक गणसंख्या पूर्ण न झाल्यास सदर सभा तहकूब केली जाईल व त्या ठिकाणी अर्ध्या तासानंतर तहकूब झालेली सभा पुन्हा होईल. या सभेस गणसंख्येची आवश्यकता राहणार नाही.

8 विशेष सर्वसाधारण सभा व तिची कार्ये :

संस्थापक सदस्य (विश्वस्त) किंवा कार्यकारी मंडळ किंवा इतर सभासद त्यांना जरूर वाटल्यास विशेष सर्वसाधारण सभा बोलावली जाईल किंवा सभेची मागणी केली जाईल त्या संदर्भातील नियम खालील प्रमाणे -

अ) सदर सभा जेव्हा संस्थापक सदस्य (विश्वस्त) यांच्या मागणीवरून किंवा यांच्या तर्फे बोलाविली जाईल तेव्हा त्यावेळी सदर सदस्यांपैकी बहुमताने;

ब) सदर सभा जेव्हा संस्थेचे कार्यकारी मंडळ यांच्या मागणीवरून बोलाविली जाईल तेव्हा त्यावेळी सदर सदस्यांपैकी बहुमताने;

क) सदर सभा जेव्हा संस्थेचे इतर सभासद यांच्या मागणीवरून बोलाविली जाईल तेव्हा त्यावेळी सदर सदस्यांपैकी बहुमताने; अशा प्रकारची सभा बोलाविण्याकरीता मा. अध्यक्ष / मा. कार्यकारी अध्यक्ष यांचेकडे त्या सभेचे विषय व ठराव यांचा उल्लेख करून लेखी मागणी करावी. अशा प्रकारची सभा बोलाविण्यासाठी मागणी केलेल्या दिवसापासून 21 (एकवीस) दिवसांचे आत सभा घेण्यात येईल व अशा सभेची सूचना सर्व सभासदांना सभेच्या 7(सात) दिवस अगोदर

पाठविण्याची व्यवस्था केली जाईल.

9 संस्थेचे कार्यकारी मंडळ, पदाधिकारी व त्यांची रचना :

संस्थेचे कार्यकारी मंडळ हे कमीतकमी 7 सदस्यांचे असेल, कार्यकारी मंडळामध्ये खालील प्रमाणे पदाधिकारी असतील.

1) अध्यक्ष 2) कार्यकारी अध्यक्ष 3) सचीव

10 कार्यकारी मंडळाचा कार्यकाल व निवड पद्धती :

अ) कार्यकारी मंडळाचा कार्यकाल एकूण 5 वर्षाचा राहील.

ब) कार्यकारी मंडळाची निवड / नियुक्ति दर 5 वर्षांनी होईल.

क) कार्यकारी मंडळामधील एकुण सदस्यांपैकी किमान 4 सदस्य विश्वस्तांपैकी असतील व त्यांची निवड विश्वस्तांमार्फत केली जाईल व उरलेल्या जगांसाठी सदस्यांची नेमणूक / सन्माननीय सदस्य व आजीव सदस्य यांच्यामधून केली जाईल व ही निवड विश्वस्त, सन्माननीय सदस्य व आजीव सदस्य मिळून करतील.

11 कार्यकारी मंडळाचे पदाधिकारी व त्यांची कार्ये :

अ) अध्यक्ष :

सर्वसाधारण सभेचे व कार्यकारी मंडळाच्या सभेचे अध्यक्षस्थान स्वीकारून काम चालविणे व सभेवरती नियंत्रण ठेवणे. संस्थेचे उद्देश्य साध्य करण्याचा प्रयत्न करणे व संस्थेच्या कार्यावर सर्वसाधारण देखरेख ठेवणे.

ब) कार्यकारी अध्यक्ष :

अध्यक्षांच्या गैरहजेरीत अध्यक्षांचे कार्य करणे. संस्थेच्या वतीने भरविण्यात येणाऱ्या विविध वैद्यकीय शिबिरांचे आयोजन करणे. संस्थेच्या उद्देश्यपूर्तीसाठी अनुषंगिक कार्ये करणे. संस्थेच्या संशोधन या उद्देश्यपूर्तीसाठी कार्य करणे. त्यासाठी विविध सरकारी निमसरकारी कार्यालयातील संबंधित विभागांशी संपर्क साधणे. संस्थेच्या दैनंदिन कारभारावरती नियंत्रण ठेवणे संस्थेच्या नोकरवर्गास दैनंदिन कामकाजासंबंधी आवश्यक असलेले आदेश देणे व त्यांची अंमलबजावणी करून घेणे.

तसेच संस्थेच्या हेतु व उदिष्टांसाठी सरकारी, निमसरकारी, परदेशी व इतर संस्था व लोकांकडुन निधी उभारणे.

क) सचिव / ~~सेक्रेटरीस~~ :

वेळोवेळी सभा बोलविणे, सभांची सर्व व्यवस्था पाहणे, सभांचे वृतांत ठेवणे वार्षिक अहवाल छापून प्रसिद्ध करणे, संस्थेचा पत्र व्यवहार पाहणे, संस्थेचे हिशोब ठेवणे संस्थेच्या कार्यालयीन कामकाजावर लक्ष ठेवणे. संस्थेच्या कार्याबद्दल प्रचार करणे.

ड) सदस्य :

कार्यकारी मंडळातील इतर सदस्यांना संस्थेच्या उद्देश्यपूर्तीसाठी केल्या जाणाऱ्या कार्यात मदत करणे. सभेस हजर राहणे.

12 कार्यकारी मंडळाची सभा व मागणीची सभा :

कार्यकारी मंडळाची सभा कमीतकमी दर 3 महिन्यांतून एकदा तरी बोलाविली पाहिजे व कार्यकारी मंडळाच्या 2/3 सभासदांनी लेखी मागणी केल्यास तातडीची कार्यकारणी सभा अध्यक्ष / कार्याध्यक्षांनी 3 दिवसांचे आत बोलाविली पाहिजे.

13 कार्यकारी मंडळाच्या सभेची सूचना व गणसंख्या :

कार्यकारी मंडळाच्या सभेची सूचना 3 दिवस अगोदर पाठविली पाहिजे व सदर सभेत एकूण 1/3 सभासदांचा कोरम राहिल. कोरम अभावी सभा तहकूब झाल्यास पुन्हा अर्ध्या तासाने तेथेच भरेल त्यास कोरमची आवश्यकता राहणार नाही.

14 कार्यकारी मंडळातील रिक्त पदे भरण्याबाबत :

कार्यकारी मंडळातील कोणतेही पद कोणत्याही कारणामुळे रिकामे झाल्यास त्या जागी नवा सभासद नेमण्याचे काम विश्वस्तांच्य बहुमताने होईल. ही जागा रिक्त ठेवायची की नाही याचा निर्णय विश्वस्त घेतील.

15 कार्यकारी मंडळाची कर्तव्ये व अधिकार :

1) कार्यकारी मंडळाची सभा 3 महिन्यातून एकदा तरी बोलाविली पाहिजे.
2) कार्यकारी मंडळाच्या 2/3 सभासदांनी लेखी मागणी केल्यास तातडीची सर्वसाधारण सभा अध्यक्षांनी तीन दिवसांचे आत बोलाविली पाहिजे.
3) संस्थेच्या सेवकांची नेमणूक करणे त्यांच्यावर नियंत्रण ठेवणे त्यांना कामावरून काढून टाकणे की ज्यामुळे संस्थेचे कामकाज व्यवस्थित चालेल.
4) संस्थेच्या अंतर्गत चालणाऱ्या इतर शाखेवर नियंत्रण ठेवणे.
5) संस्था चालविण्याकरिता आवश्यक असलेले किरकोळ नियम तयार करणे.
6) सर्वसाधारण सभेच्या ठरावाची पूर्तता करणे.
7) उपसमित्या नेमणे किंवा एखाद्या कामाकरीता एखाद्या सदस्याला विशेष अधिकार देणे.
8) जमाखर्चाच हिशोब ठेवून ऑडिट करणे व ते सर्वसाधारण सभेपुढे ठेवणे.
9) आजीव सभासदांसाठी आलेल्या अर्जाचा विचार करणे.
10) सभासदांची यादी ठेवणे. संस्थेच्या कर्मचाऱ्यांची व त्यांच्या नोकरीचे अटींचे पुस्तक कायद्याप्रमाणे ठेवणे व त्याप्रमाणे परिशिष्ट 2 प्रमाणे माहिती रजिस्ट्रार यांचे कार्यालयात दरवर्षी पाठविणे.
11) कार्यकारी मंडळाचे सभेस एकूण 1/3 सभासदांचा कोरम राहिल. कोरम अभावी सभा तहकूब झाल्यास पुन्हा अर्ध्या तासाने तेथेच भरेल त्यास कोरमची आवश्यकता राहणार नाही.

16 संस्थेचा निधी, मिळकत व विनियोग :

संस्थेचे निधीमध्ये देणगी, सरकारी अनुदान, सभासदत्वासाठी देणगी तसेच सभासदांनी केलेला कार्यक्रमाचा खर्च वजा जाता शिल्लक राहिलेली रक्कम संस्थेच्या मिळकतीचा विनियोग संस्थेच्या उद्देश्यावर करणेत येईल.

17 संस्थेचे उद्दिष्ट निहाय खर्चाची तरतूद :

संस्थेच्या एकूण उत्पन्नातून :-

1) व्यवस्थापन उद्देशासाठी

2) संशोधन या उद्देशासाठी

3) वैद्यकीय सेवा या उद्देशासाठी

18 कर्ज किंवा ठेवी या संबंधीची तरतूद :

कलम 36 (3) प्रमाणे मा. धर्मादाय सह-आयुक्त यांचे पूर्व परवानगीने ठेवी किंवा अनामत रक्कमा स्वीकारणेत येतील.

19 स्थावर मालमत्ता खरेदी विक्री बाबतची तरतूद :

स्थावर मालमत्तेची खरेदी किंवा विक्री करताना सर्वसाधारण सभेची मंजुरी घेऊन कलम 35 प्रमाणे खरेदी व कलम 36 (1) प्रमाणे विक्रीत मा. जॉईंट चॅरिटी कमिशनर यांच्या पूर्व परवानगीने स्थावर मालमत्तेचे खरेदी विक्री व्यवहार केले जातील. अशा प्रकारच्या व्यवहारामध्ये आवश्यक असलेली कार्ये करण्याचे अधिकार कार्यकारी अध्यक्षांना देण्यात येतील.

20 बँक खाते :

ट्रस्ट ॲक्ट प्रमाणे मान्यता प्राप्त बँकेत संस्थेचे खाते उघडण्यात येईल. व बँकेतून पैसे काढण्याचा अधिकार कार्यकारी अध्यक्ष व सचिव दोघांचे एकत्रित / वैयक्तिक सहीने बँकेतून पैसे काढता येतील.

21 सभासदांची यादी ठेवण्याची पद्धत :

सभासद यादी सन 1971 च्या संस्था नोंदणी नियम क्रमांक 15 अनुसार अनुसूची 6 चे नमुन्यात ठेवण्यात येईल.

22 नियम आणि नियमावलीतील बदल करण्याची तरतूद :

नियमावलीत बदल करावयाचा झाल्यास, नवीन नियमाची वाढ करायची असल्यास किंवा अस्तित्वात असलेला एखादा नियम काढून टाकायचा झाल्यास असा ठराव वार्षिक सभासदांच्या सभेत हजर सभासदांच्या 3/5 बहुमताने व असिस्टंट चॅरिटी कमिशनरच्या मंजुरी करीता पाठविले जाईल.

23 संस्थेच्या नावात व उद्देशात बदल करण्याबाबतची तरतूद :

संस्थेचे नाव अथवा उद्देशात बदल करावयाचा झाल्यास अथवा 2 संस्थांचे विलिनीकरण करायचे असल्यास 1860 चे नोंदणी अधिनियमातील कलम 12 अथवा 12 अ प्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

विसर्जन :

संस्थेचे कार्य बंद करावयाचे असल्यास 3/5 सभासदांच्या बहुमताने सभेस मंजुरी घ्यावी लागेल व संस्थेचे सर्व प्रकारचे देवाणघेवाण संबंधीचा व्यवहार पूर्ण करावा लागेल. संस्थेची शिल्लक मालमत्ता दुसऱ्या संस्थेला दान म्हणून देता येईल. सोसाटीज् रजिस्ट्रेशन ॲक्ट 1860 चे कलम 13 व 14 प्रमाणे संस्था विसर्जनाची कार्यवाही पूर्ण करावी लागेल.

## दाखला

दाखला देण्यात येतो की कै. राजाराम तुकाराम भोईटे स्मृती आरोग्य प्रतिष्ठान, बारामती या संस्थेची ही सत्य व खरी नियम व नियमावलीची प्रत आहे.

प्रताप राजाराम भोईटे

मोहन नामदेवराव भापकर

सौ. सावळा मोहन भापकर

सौ. पाकुळा गणपतराव

सही शिक्क्याची खरी नक्कल

अधीक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
पुणे विभाग, पुणे

तयार करणाऱ्याचे नाव
वाचणाऱ्याचे नाव

| अ. क्र. : | संपूर्ण नांव | पत्ता | हुद्दा | वय | राष्ट्रीयत्व | व्यवसाय |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | श्री. प्रताप राजाराम भोईटे. | गिरीराज हॉस्पीटल बारामती, जि. पुणे. | अध्यक्ष | ४७ | भारतीय | शेती |
| २. | डॉ. रमेश राजाराम भोईटे. | गिरीराज हॉस्पीटल बारामती, जि. पुणे. | कार्यकारी ~~सचिव~~ अध्यक्ष | ४२ | भारतीय | वैद्यकीय |
| ३. | सौ. निर्मला रमेश भोईटे. | गिरीराज हॉस्पीटल बारामती, जि. पुणे. | सचिव | ३० | भारतीय | लॅब टेक्निशियन |
| ४. | श्री. मोहनराव नामदेवराव भापकर | "नंददीप" बुरुड गल्ली, बारामती, जि. पुणे. | सदस्य | ५५ | भारतीय | शेती. |
| ५. | सौ. सावित्री मोहनराव भापकर | "नंददीप" बुरुड गल्ली, बारामती, जि. पुणे. | सदस्या | ५० | भारतीय | सुखवस्तू |
| ६ | सौ. यमुना बबनराव निकम | मु. मलठण, पोस्ट-मलठण जि. सातारा. | सदस्या | ५७ | भारतीय | सुखवस्तू |
| ७. | डॉ. सतीश कृष्णराव पवार | १५/२ पहिला मजला उर्मिला को. ऑप. हौ. सोसा. बँक ऑफ महाराष्ट्र जवळ. धनकवडी, पुणे-४३ | सदस्य | ३२ | भारतीय | वैद्यकीय |

५] आम्ही खालील सह्या करणारे ~~क्षे~~ कै. राजाराम तुकाराम भोईटे स्मृती आरोग्य प्रतिष्ठान, बारामती, चे सदस्य जाहिर करतो की, संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये अभिप्रेत केलेली संस्था अस्तित्वात आणण्याची आमची इच्छा असून वरील उद्देशाने आम्ही एकत्र येवून [ कै. राजाराम तुकाराम भोईटे स्मृती आरोग्य प्रतिष्ठान, बारामती ही संस्था आज दिनांक १४|१२|९४ रोजी

... नोंदणी करण्यासाठी

नाव :- श्री ... Honble Dycc
अर्ज प्राप्त दि. 25/05/2016
नक्कल तयार दि. 29/05/2017
नक्कल दिली ता. दि.
26/10/18
अधीक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी
कार्यालय पुणे विभाग पुणे

क्र. र. क्र. 5030/17

CR No- 39

## परिशिष्ट ३

कानुन १३(१)पहा

सार्वजनिक ट्रस्ट रजिस्ट्रेशन ऑफिस येथे ठेवणेत आलेल्या रजिस्टरात नोंदविलेल्या पब्लिक ट्रस्टच्या केलेल्या नोंदणीतील झालेल्या बदलाबाबतच्या अगर इष्ट अशा करावयाच्या बदलबाबतचा रिपोर्ट.

सार्वजनिक ट्रस्टचे नांव :- कै. राजाराम तुकाराम मोरिटे स्मृती आरोग्य प्रतिष्ठ

सार्वजनिक ट्रस्टचा रजिस्ट्रर नंबर :- एफ - १०५४५\पुणे

सार्वजनिक ट्रस्टचा पत्ता :- जिरीयल हॉस्पीटल, बारामती, जि. पुणे.

| बदलाचे स्वरुप | बदलाचे कारण | शेरे |
|---|---|---|
| आपल्या रेकॉर्डवर असलेली खालील नांवे कमी करावीत.<br>सन २०१० ते २०१५<br>१. डॉ. श्री. रमेश राजाराम मोरिटे<br>२. सौ. निर्मला रमेश मोरिटे<br>३. श्री. सदाशिव धोंडिबा सातव<br>४. श्री. फुलाराव गणपती पवार<br>५. श्री. मोहनराव नामदेवराव भापकर<br>६. सौ. यमुना बाळासाहेब निकम<br>७. डॉ. सतीश फुलाराव पवार<br>८.<br>९.<br>१०.<br>११.<br>खालील नावे सन २०१५ ते सन २०२० या सालाकरिता नोंद करावीत.<br>१. डॉ. श्री. रमेश राजाराम मोरिटे<br>अध्यक्ष<br>२. सौ. निर्मला रमेश मोरिटे<br>सचिव | या संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा दि. सन २०१५ रोजी होवून ठराव क्र ने सन २०१५ ते सन २०२० या सालाकरीता नविन कार्यकारिणी निवडण्यात आली. | १. सर्व साधारण सभेची नोटीस सत्यप्रत<br>२. नोटीस मिळाल्याचा पुरावा<br>३. सभेला हजर सभासदांची यादी<br>४. सभेच्या ठरावाची सत्यप्रत<br>५. जुन्या कार्यकारीणीचे ना हरकतपत्र<br>६. नविन कार्यकारीणीचे संमतीपत्र आणि त्यांची ओळखपत्रे<br>७. इव्हिडन्स क्लोज पुरशिस<br>८. विलंब माफिचा अर्ज प्रतिज्ञापत्रासह.<br>९. घटना व प्रमाणपत्राची सत्यप्रत<br>१०. एकुण सभासदांची यादी |

(२)

| | | |
|---|---|---|
| ३. श्री. सदाशिव धोंडीबा सातव | | |
| ४. श्री. कृष्णराव गणपती पवार | | ११. नो लिटिगन्स पुरशिस |
| ५. श्री. मोहनराव नामदेवराव आपकर | | १२. पुराव्याचे प्रतिज्ञापत्र |
| ६. सौ. यमुना जबनराव निकम | | |
| ७. डॉ. सतीश कृष्णराव पवार | | |
| ८. | | |
| ९. | | |
| १०. | | |
| ११. | | |

19 MAY 2017

Mrs. N. R. Bhoite
रिपोर्ट करणा-या व्यक्तीची/ ट्रस्टीची सही
(सौ. निर्मला रमेश भोईटे)

मी उपनिर्दिष्ट श्री/सौः निर्मला रमेश भोईटे राहणारः बारामती, जि. पुणे ४१३१०२ येथिल रहिवासी असून प्रतिज्ञापूर्वक इकरार करतो की, अर्जात नमूद केलेली माहिती माझे माहितीप्रमाणे व समजुतीप्रमाणे खरी व बरोबर आहे. येणे प्रमाणे, पुणे येथे प्रतिज्ञापूर्वक इकरार केला असे.

उपरोक्त तारीख २२ माहे ०५ सन २०१७

NOTARY
Sk. Muzammil Haider
Kondhwa, Pune City
Reg. No. 11208
Expiry Date 23/4/2020
GOVERNMENT OF INDIA

BEFORE ME
Sk. Muzammil Haider
NOTARY
GOVT. OF INDIA
22 MAY 2017

Mrs. N. R. Bhoite
अर्जदारांची सही व शिक्का
(सौ. निर्मला रमेश भोईटे)

(3)

Order Below Exh.1 in Change Report No.3960/2017

In the matter of - Kai Rajaram Tukaram Bhoite Smruti Arogya Pratishthan

P.T.R. No. F-10595 (Pune)

---

Reporting Trustee has filed the present change report under Section 22 of the Maharashtra Public Trusts Act, 1950 to record the changes in the entries in the register kept under Section 17 of Maharashtra Public Trusts Act, 1950. No objection is received till date to the reported change. Hence, the change report is tried ex-parte.

Reporting Trustee has on solemn affirmation subscribed that the contents of the change report to be true to the best of his information and belief as per Rule 6 (4) of Maharashtra Public Trusts Rules, 1951. There is nothing on record to show that reported change is not genuine. Hence, reliance is placed on the statement of the Reporting Trustee that change has occurred as stated in the change report. The tenure of the trustees in the present change report is already expired and it has become academic.

Hon'ble Lordship in the case of Jagatnarayansingh Swarupsingh Vs. Swarupsingh Education Society 1980 Mh.L.J. 372 have observed that "interest of justice and of the very public trust in question would be better served by drawing a curtain on this litigation which in the circumstances has become infructuous. Keeping it nevertheless alive would be an exercise in futility. Subsequent developments have rendered it unnecessary to go into that question. Question in the abstract or questions academic are normally not decided by Courts. There is no such act by *erstwhile* managing committee which can be said to be against the interest of the trust. Moreover, there are many in built provisions in the act itself and rules thereunder operating as safety valve for protection of public trusts.

(4)



Remand to inquiry into the theoretical legality or otherwise of 1974 elections already superseded by the 1979 elections become academic".

Considering the observations of Hon'ble Lordship in the cited case law, that the Court cannot ignore subsequent events but must wield its order in the light thereof. Where the appellants challenged change of managing body but term of managing body expired by the time of hearing appeal and new managing body took charge it was held that, the old body during its regime carries on routine administration and therefore the legality of election of old body became merely academic. The present change report is to be considered in view of above observations. Factual averments in the present change report are not contested. Undisputed position is that term of managing committee elected is already expired. There is nothing on record to show that they sold or purchased immovable property nor has taken major policy decision against interest of the public trust. It appears Managing Committee has carried out only routine administration. There is nothing on record to disbelieve the reporting trustee. Hence, following order:-

O R D E R

1. Change Report is accepted as prayed for.
2. Entries in Schedule 'I' be amended accordingly.

Date: 25.05.2017
Place: Pune

Deputy Charity Commissioner
Pune Region, Pune

सही शिक्क्याची खरी नक्कल

26/10/17

अधीक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी
कार्यालय पुणे विभाग पुणे

मी नक्कल तयार केली
मी वाचली
मी रुजवात केली